# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठात द्विदिवसीय मानसशास्त्रीय कार्यशाळा संपन्न**
**आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा उपक्रम**

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि महाराष्ट्र महिला आयोग यांचे संयुक्त विद्यमाने विद्यापीठात ‘मानसशास्त्र : काल, आज आणि उद्या’ विषयावर द्विदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. पंकज वसाडकर, प्राचार्य डॉ. सुभाष गवई, कार्यशाळेचे संयोजक तथा आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

कार्यशाळेमध्ये एम.ए. प्रथम वर्ष कॉऊन्सिलींग ॲण्ड सायकोथेरपी विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी एका मानसिक आजारावर आधारित लघुचित्रपटाची निर्मिती केली. याप्रसंगी लघुचित्रपटाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे शुभहस्ते करण्यात आले.

लघुचित्रपटाचे उद्‌घाटन झाल्यानंतर हा लघुपट कार्यशाळेत प्रदर्शित करण्यात आला. लघुचित्रपटाचे निर्माता व्ही.के. राठोड, निर्देशन क्रीष्णा राठोड यांनी, तर कथा डॉ. पंकज वसाडकर, छायाचित्रण भूषण परळीकर, विश्वेश्वर ठाकरे, संकलन यश राठोड, डॉ. आनंद बरडे, भूमिका क्रीष्णा राठोड, विश्वेश्वर ठाकरे व अंकुश परळीकर यांनी केले. लघुचित्रपट बनविण्याकरीता आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०५/०३/२०१९.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी